| | |
|---|---|
| | दाखल तारीख – १३/०६/२०२२ |
| | नोंदणी तारीख – १३/०६/२०२२ |
| | निकाल तारीख – २१/०७/२०२६ |
| | कालावधी – ०४ वर्षे, ०१ महिने, ०८ दिवस |

**दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, विटा**
**ता.खानापूर, जि.सांगली यांचे न्यायालयात,**

**[पीठासीन अधिकारी श्रीमती पल्लवी मा. सुर्यवंशी]**

**नियमित दिवाणी दावा क्र. ३९४/२०२२**
**निशाणी क्र. – २९**

| | |
|---|---|
| संपत वासुदेव चव्हाण,<br>उ.व.५९, धंदा – शेती,<br>रा. तांदळवाडी(तांदळगांव), ता.खानापूर, जि.सांगली | ..........वादी |
| **विरुध्द** | |
| १) श्री. भास्कर सुखदेव चव्हाण,<br>उ.व.५५, व्यवसाय – शेती,<br>२) मधुकर वासुदेव चव्हाण,<br>उ.व.५२, व्यवसाय – शेती,<br>३) प्रकाश वासुदेव चव्हाण,<br>उ.व.५५, व्यवसाय – शेती,<br>४) लक्ष्मी वासुदेव चव्हाण,<br>उ.व. ८०, व्यवसाय – शेती<br>रा. तांदळवाडी(तांदळगांव), ता.खानापूर, जि.सांगली | .......प्रतिवादी |

**दावा : दावा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेकरीता....**

**उपस्थितीः–**
**वादीतर्फे विधीज्ञ श्री.एल.डी.भोसले**
**प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.ए.बी.जाधव**

## न्यायनिर्णय
**(पारित दिनांक २१/०७/२०२६)**

वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून पृथक व अलग कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे.

**दाव्याची थोडक्यात हकीकत अशी की,**

२. **दावा मिळकत –**

**अ)** मौजे तांदळवाडी(तांदळगांव), ता.खानापूर, जि.सांगली येथील गट नं.७३ क्षेत्र ०हे – ७०आर, हिस्सा संपुर्ण, गट नं.८० क्षेत्र ०हे–५१आर, हिस्सा ०.२५.५, गट नं.२९९ क्षेत्र ०हे – ०७आर, हिस्सा संपुर्ण, गट क्र.३३, क्षेत्र ३हे.६३आर, हिस्सा १हे.८९आर.

**ब)** मौजे कमळापूर, ता.खानापूर, जि.सांगली येथील गट नं.३०७ क्षेत्र ०हे–४५आर, पो.ख. ०हे–०९आर, हिस्सा संपुर्ण, गट नं२९९ क्षेत्र १हे–७८आर, पो.ख. ०हे–२७आर, हिस्सा ०.१६.१५आर, गट नं.३०९ क्षेत्र ०–४९आर, पो.ख.०हे–१२आर, हिस्सा ०हे १५आर, गट नं.३०४ क्षेत्र ०हे–०३आर, पो.ख. ०हे–०९आर, हिस्सा एक दिवस पाणी पाळी,

येणेप्रमाणे जमीन मिळकतीमधील झाडझुड, दगडमाती, लाकुडफाटा, तालबंधोरा, इ. तदंगभूत वस्तुसह.

(या मिळकतींना सोईकरीता दावा जमीन मिळकती असे संबोधण्यात येईल).

**३.** दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जीत मिळकती असून प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वादी यांचे भाऊ तर प्रतिवादी क्र.४ या वादी यांच्या आई आहेत. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे वडील व प्रतिवादी क्र.४ यांचे पती वासुदेव चव्हाण यांची वडीलार्जीत मिळकती होत्या. वासुदेव यांचे मृत्युपश्चात दावा मिळकतींना वादी व प्रतिवादी यांच्या नावाची वारसाने नोंद झाली. परंतू दावा मिळकतींचे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान आजतागायत सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. घर मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी हे वेगवेगळे राहत असून जरी ७/१२ पत्रकी सह हिस्सेदार म्हणून नोंद असली तरी त्यांचे यापुर्वीच तोंडी वाटप झालेले आहे. अशी परिस्थिती असताना वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे दिनांक ०५.०६.२०२२ रोजी दावा मिळकतींचे वाटप करुन मागितले असता, प्रतिवादींनी दावा मिळकतीचे वाटप करुन देण्यास नकार दिला. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत दावा दाखल करुन दावा मिळकतींचे वाटप होवून मिळणेकरीता प्रस्तुत दावा दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क्र.१ ते ४ हे दाव्याचे कामी हजर झाले परंतू त्यांनी दाव्यास कैफियत दाखल न केल्याने दावा त्यांचे विरुध्द विनाकैफियत चालविणेत आला

५. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीची दाव्यातील कथने व उपलब्ध कागदपत्र यावरुन मी खालील मुद्दे नोंदवित आहे. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंद करते.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूबांच्या मिळकती असल्याचे वादी सिध्द करतात काय? | होकारार्थी |
| २. | वादी या दावा मिळकती वाटून मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास त्यांचा हिस्सा किती ? | होकारार्थी |
| 3. | आदेश व हूकुमनामा काय ? | दावा मंजूर करणेत येतो. |

## कारणमीमांसा

६. वादी यांनी स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **निशाणी २०** येथे दाखल केले आहे.

७. वादी यांनी **निशाणी क्र.२१** येथे जादा पुरावा देणेचा नसलेबाबत पुरसिस दाखल केली आहे.

८. वादीतर्फे खालील कागदोपत्री पुरावा दाखल करणेत आला.

| अ.क्र. | कागदपत्रांचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|
| १. | तांदळगांव येथील खाते क्र.१४७ चा खातेउतारा | २३ |
| २. | तांदळवाडी येथील गट क्र.७३ चा ७/१२ उतारा | ६ |
| ३. | तांदळवाडी येथील गट क्र.८० चा ७/१२ उतारा | ७ |
| ४. | तांदळवाडी येथील गट क्र.२९९ चा ७/१२ उतारा | ८ |
| ५. | तांदळवाडी येथील गट क्र.३३ चा ७/१२ उतारा | ९ |
| ६. | कमळापूर येथील खाते क्र.२०९० चा खातेउतारा | २४ |

| | | |
|---|---|---|
| ७. | कमळापूर येथील खाते क्र.६७२ चा खातेउतारा | २५ |
| ८. | कमळापूर येथील गट क्र.३०७ चा ७/१२ उतारा | १० |
| ९. | कमळापूर येथील गट क्र.२९९ चा ७/१२ उतारा | ११ |
| १०. | कमळापूर येथील गट क्र.३०९ चा ७/१२ उतारा | १२ |
| ११. | कमळापूर येथील गट क्र.३०४ चा ७/१२ उतारा | १३ |

**मुद्दे क्र.१ व २ करीता –**

मुद्दे क्र.१ व २ एकमेकांशी सलग्न असल्यामुळे कथनांची व पुराव्यांची पुनरावृत्ती टाळणेकरीता मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष एकत्रीत नोंदवित आहे.

९. वादी यांनी निशाणी २० येथे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वादी यांनी त्यांचे सरतपासात कथन केले आहे की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जीत मिळकती असून प्रतिवादी क्र.१ ते ३ हे वादी यांचे भाऊ तर प्रतिवादी क्र.४ या वादी यांच्या आई आहेत. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे वडील व प्रतिवादी क्र.४ यांचे पती वासुदेव चव्हाण यांची वडीलार्जीत मिळकती होत्या. वासुदेव यांचे मृत्युपश्चात दावा मिळकतींना वादी व प्रतिवादी यांच्या नावाची वारसाने नोंद झाली. परंतू दावा मिळकतींचे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान आजतागायत सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. घर मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी हे वेगवेगळे राहत असून जरी ७/१२ पत्रकी सह हिस्सेदार म्हणून नोंद असली तरी त्यांचे यापुर्वीच तोंडी वाटप झालेले आहे. अशी परिस्थिती असताना वादी यांनी दावा जमीन मिळकतींचे प्रतिवादी यांचेकडे दिनांक ०५.०६.२०२२ रोजी वाटप करुन मागितले असता, प्रतिवादींनी दावा जमीन मिळकतींचे वाटप करुन देण्यास नकार दिला. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत दावा दाखल करुन दावा मिळकतींचे वाटप होवून मिळणेकरीता प्रस्तुत दावा दाखल केला आहे.

१०. वादी यांनी त्यांचे कथनांपृष्ठयर्थ निशाणी ६ व ९ येथे मौजे तांदळगाव

येथील दावा मिळकतींचे ७/१२ उतारे दाखल केले आहेत. तसेच निशाणी २३ येथे खाते क्र.१४७ चा खाते उतारा दाखल केला आहे. सदर उताऱ्यांचे अवलोकन केले असता, मौजे तांदळगाव येथील दावा मिळकती गट क्र.७३, ८०, २९९ व ३३ या मिळकतींना वादी व प्रतिवादी यांची ४ आणे हिश्याने भोगवाटदार सदरी नोंद आहे. वादी यांनी मौजे कमळापूर येथील दावा मिळकतींचे ७/१२ उतारे निशाणी क्र.१० ते १३ येथे दाखल केले आहेत. सदर उताऱ्यांचे अवलोकन करता, वादी व प्रतिवादी यांचे गट क्र.३०७ मध्ये ०.४५आर क्षेत्र, गट क्र.२९९ मध्ये ०.३६.१५आर क्षेत्र, गट क्र.३०९ मध्ये ०.४९आर क्षेत्र, गट क्र.३०४ मध्ये ०.५६आर क्षेत्र समाईकरित्या नोंद आहे. वादीने दाखल केलेल्या उताऱ्यांवरुन ही बाब स्पष्ट आहे की, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान दावा मिळकतींचे अद्याप वाटप झालेले नाही. तसेच दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत.

**११.** प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्याचे कामी कोणतेही म्हणणे दाखल केले नाही अथवा वादीचा उलटतपास घेतलेला नाही. प्रतिवादी क्र.३ यांनी निशाणी क्र.२७ वरील पुरसिसने वादीचा दावा मान्य केला आहे. त्यामुळे वादीचा तोंडी पुरावा हा विनाआव्हानित राहिला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ५ नुसार '*दाव्यातील वादमुद्दे निश्चीत करणेकरीता प्रतिवादी यांनी दाव्यातील त्यांची कथने किंवा त्यांचा बचाव हा दाव्याचे कामी स्पष्टपणे कथन करुन तो शाबीत करणे आवश्यक आहे. प्रतिवादी जर त्याची कथने शबीत करणेस अथवा वादींच्या पुराव्यास आव्हान देत नसेल तर वादींची कथने शाबीत झाली असे मान्य करता येईल*'.

**१२.** वादीने दाखल केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यांचे अवलोकन करता, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान दावा मिळकतींचे दावा दाखल करण्यापुर्वी तोंडी अथवा लेखी वाटप झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांना दावा मिळकतीमध्ये समान हिस्से प्राप्त होतात. त्यानुसार दावा जमीन मिळकतीमध्ये वादी

संपत, प्रतिवादी क्र.१ भास्कर, प्रतिवादी क्र.२ मधुकर, प्रतिवादी क्र.३ प्रकश व प्रतिवादी क्र.४ लक्ष्मी यांना प्रत्येकी १/५ हिस्सा प्राप्त होतो.

**१३**. उपरोक्त सर्व विवेचनावरुन प्रस्तुत दावा हा विनाअव्हानित आहे. त्याचबरोबर वादी यांनी दावा मिळकतींचे लेखी वाटप झाले नसून वाटपास पात्र अशा मिळकती आहेत, तसेच वादी व प्रतिवादी हे दावा मिळकती वाटून मिळण्यास पात्र आहेत हे संभाव्य गोष्टींचे प्राबल्य (Preponderance of probability) या निकषावर सिध्द केले आहे. त्यामुळे वादीचा दावा मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मुद्दे क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १) | वादीचा दावा मंजूर करणेत येतो. |
| २) | मौजे तांदळवाडी (तांदळगाव), ता.खानापूर, जि.सांगली येथील दावा मिळकती गट क्र.७३, ८०, २९९ व ३३ तसेच मौजे कमळापूर, ता.खानापूर, जि.सांगली येथील गट क्र.३०७, गट क्र.२९९, गट क्र.३०९ व गट क्र.३०४ या मिळकतींमध्ये वादी संपत वासुदेव चव्हाण, प्रतिवादी क्र.१ भास्कर वासुदेव चव्हाण, प्रतिवादी क्र.२ मधुकर वासुदेव चव्हाण, प्रतिवादी क्र.३ प्रकश वासुदेव चव्हाण व प्रतिवादी क्र.४ लक्ष्मी वासुदेव चव्हाण यांचा प्रत्येकी १/५ हिस्सा जाहीर करणेत येतो. |
| २) | दाव्याचा खर्च वादी व प्रतिवादी यांनी आपआपला सोसनेचा आहे. |
| ३) | दावा जमीन मिळकतींचे वाटपाकरीता न्यायनिर्णयाची प्रत मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ प्रमाणे पाठविण्यात यावी. |
| ४) | येणेप्रमाणे प्राथमिक हुकूमनामा करणेत यावा. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

PALLAVI MANSING SURYAWANSHI

Digitally signed by PALLAVI MANSING SURYAWANSHI
Date: 2026.07.21 17:08:27 +0530

दिनांक – २१/०७/२०२६
ठिकाण– विटा

**[श्रीमती पी.एम.सुर्यवंशी]**
२रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,विटा
ता.खानापूर, जि. सांगली

**प्रमाणपत्र**

मी हमी देते की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | अभिजित रा. खटावकर |
| न्यायालय | २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा. |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | २१/०७/२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २१/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | २१/०७/२०२६ |